सत्यमेव जयते

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल

## डॉ. पा. व. चेरियन्

यांचे

# अभिभाषण

१५ मार्च १९६७

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

महाराष्ट्र राज्य विधान मंडळाचे
मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

# राज्यपालांचे

## अभिभाषण

सभापती, अध्यक्ष व सन्माननीय सदस्य,

१. नवीन राज्य विधानमंडळाच्या या पहिल्या अधिवेशन प्रसंगी आपणा सर्वांचे स्वागत करताना मला अत्यंत आनंद होत आहे. तसेच, नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत आपल्यापैकी जे सदस्य पुन्हा निवडून आले किंवा नव्याने निवडून आले त्या सर्वांचे यानिमित्ताने मी अभिनंदन करू इच्छितो.

२. या प्रसंगी या राज्यातील लोकांनी आपल्या मताधिकाराचा वापर करताना जो आदर्श घालून दिलेला आहे त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत. जनतेला व राज्य सरकारला तर याचे श्रेय आहेच, शिवाय त्यामुळे, लोकशाही ध्येयावर व मार्गावर असलेली आमची अविचल निष्ठाही पुन्हा एकदा जगाच्या निदर्शनास आली आहे. तसेच, निवडणुका सुरळीत व कार्यक्षमरीत्या पार पाडण्यात आल्याबद्दल राज्याची निवडणूक यंत्रणाही या श्रेयाची वाटेकरी आहे.

३. या राज्यातील जनतेने हे सरकार पुन्हा निवडून देऊन त्यावरील आपला विश्वास प्रकट केला आहे. हे नवे सरकार स्वतःपुढे पर्वीपासूनच ठेवलेला विकासविषयक कार्यक्रम कार्यान्वित करण्यास कटिबद्ध आहे. तसेच, पिकांच्या पुढील दोन हंगामांत, अन्नधान्याच्या बाबतीत या राज्यास स्वयंपूर्ण करण्याचा आपला निर्धारही त्याने घोषित केलेला आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी या सरकारने, जमिनीचा विकास करणे, पाणीपुरवठ्याच्या सोयीत वाढ करणे आणि संकरित बी-बियाण्यांची निपज व वापर लोकप्रिय करणे यांसाठी यापूर्वीच उपाययोजना केलेल्या आहेत. या कार्यक्रमात सतत वाढ करण्यात येत असन, या वर्षी, भात, ज्वारी, गहू व मका यांच्या अधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या विविध संकरित बी-बियाण्यांची ५४ लाख एकर जमिनीत लागवड करण्यात येईल. विहिरींपासून होणाऱ्या पाणीपुरवठ्यात वाढ करण्यासाठी १९१ वेधण यंत्रांचा व ४०० वायुसंपीडकांचा वापर करण्यात येत आहे. कृषि उत्पादन वाढविण्यासाठी १९६५–६६ सालच्या रब्बी हंगामात मोफत पाणीपुरवठ्याची सवलत देण्यात आली होती व ती इतकी लोकप्रिय झाली की रब्बीच्या लागवडीखालील क्षेत्रात २·२५ लक्ष एकरांपासून ४·७२ लक्ष एकरांपर्यंत म्हणजेच ११० टक्क्यांपर्यंत वाढ झाली. अन्नधान्य पिकांना अधिक प्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी सरकारी कालव्यांमधून उसासाठी देण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यात २५ टक्क्यांनी कपात करण्यात आली होती. मालगुजारी तलावांची दुरुस्ती करण्यासाठी व लघु सिंचनाच्या व उद्धरण सिंचनाच्या नवीन योजना हाती घेण्यासाठी जिल्हा परिषदांना

२·६ कोटी रुपयांची रक्कम देण्यात आली होती. जमीन विकासाचा वेग वाढवण्यासाठी ट्रॅक्टर्सच्या संख्येत १२० पासून १५० पर्यंत व बुलडोझरच्या संख्येत ९८ पासून ३५० पर्यंत वाढ करण्याचे सरकारने योजिले आहे.

४. दुग्धम अन्नाच्या पुरवठ्यात वाढ करण्याच्या प्रश्नालाही सरकार तेवढेच महत्त्व देते. पुढील वर्षामध्ये दूधपुरवठ्यात वाढ करण्यासाठी दुभती गुरे आणि नवीन यंत्रसामग्री व वाहने यांच्या खरेदीसाठी सहकारी संस्थांना कर्ज मंजूर करण्याच्या योजनांना जोमाने चालना देण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यातील दापचरी येथील दूधपुरवठा प्रकल्पाचे काम अगोदरच सुरू झाले आहे. त्यामध्ये ७,००० ते ८,००० दुभती गुरे ठेवण्याची व्यवस्था आहे. प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यावर त्यापासून मुंबईस अधिक दूधपुरवठा होईल, एवढेच नव्हे तर दुग्ध व्यवसायविषयक प्रश्नांच्या अभ्यासासाठी प्रयोगशाळा म्हणूनही या प्रकल्पाचा उपयोग होईल.

५. मत्स्यव्यवसायाच्या क्षेत्रात, मासळीच्या बियाण्याच्या बाबतीत हे राज्य स्वयंपूर्ण व्हावे या दृष्टीने यापूर्वीच प्रयत्न करण्यात आलेले आहेत. या बाबतीत आतापावेतो, राज्याला पश्चिम बंगालवर अवलंबून रहावे लागत होते. दक्षिण कॅनरामधील योजनेच्या धर्तीवर, सहकारी क्षेत्रात मत्स्यव्यवसाय प्रकल्प सुरू करण्याची योजनासुद्धा विचाराधीन आहे.

६. पशुसुधार योजनेखाली चिपळूण येथे सुरू केलेला प्रकल्प पुढील वर्षी पूर्ण झाल्यावर या प्रकल्पाखाली १ लाख गाई व म्हशी आणता येतील. राज्यातील गुरांचा दर्जा सुधारण्यासाठी या वर्षी ४० नवीन कृत्रिम रेतन केंद्रेसुद्धा उघडण्यात येतील.

७. कृषिशिक्षणाचे एकीकरण व प्रसार यासाठी आणि कृषि उत्पादनास मदत म्हणून, कृषि विद्यापीठाची स्थापना करण्याचेही सरकारने ठरविले आहे. या विद्यापीठास राज्यातील सर्व कृषि महाविद्यालये संलग्न असतील. विद्यापीठाच्या स्थापनेसाठी पुढील अधिवेशनात सरकार एक विधेयक सादर करील. दरम्यान, पूर्वतयारीसाठी एक समिती नेमण्यात आलेली असून त्याप्रीत्यर्थ पुणे येथे विद्यापीठाचे एक लहानसे कार्यालय उघडण्यात आलेले आहे.

८. पावसाच्या अभावी १९६५–६६ मध्ये निर्माण झालेली शेतीची प्रतिकूल परिस्थिती काही मर्यादेपर्यंत, या वर्षीसुद्धा तशीच चालू आहे. २६ जिल्ह्यांपैकी १४ जिल्ह्यांतील सुमारे ५,००० गावे टंचाईग्रस्त होण्याचा संभव आहे. यामुळे सहाय्यावर व सहाय्यविषयक कामांवर जादा खर्च करणे अनिवार्य झाले आहे. टंचाईग्रस्त क्षेत्रासाठी १९६५–६६ च्या महसुली वर्षाकरिता अदमासे १४ कोटी रुपये खर्चाचा एक कार्यक्रम तयार करण्यात येऊन याबाबत मदत मिळावी म्हणून तो केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला होता. आतापावेतो केंद्र सरकारने कर्जाच्या स्वरूपात ४ कोटी रुपये व अनुदानाच्या स्वरूपात ३·५ कोटी रुपये एवढीच रक्कम दिलेली आहे. तगाईच्या व इतर खर्चाच्या स्वरूपात राज्याने वितरित केलेली मदत ही केंद्र सरकारने दिलेल्या सहाय्यापेक्षा किती तरी प्रमाणात अधिक आहे. या सर्वांमुळे राज्याच्या अर्थोत्पादक साधनांवर अतिशय ताण पडला व परिणामी सरकारला १९६५–६६ व १९६६–६७ या वर्षांमध्ये काटकसरीचे कडक उपाय योजावे लागले.

९. टंचाईच्या या परिस्थितीबरोबरच रत्नागिरी जिल्ह्याच्या काही भागात नोव्हेंबर १९६६ मध्ये वादळामुळे गंभीर स्वरूपाची हानी झाली. हे नुकसान अंदाजे ६·१७ कोटी रुपयांइतके आहे. २·२५ कोटी रुपयांचा सहाय्य व पुनर्वसन कार्यक्रम ताबडतोब हाती घेण्यात आला. या कामासाठी भारत सरकारने आतापर्यंत केवळ ५० लाख रुपयांचे कर्ज मंजूर केलेले आहे.

१०. किमती सतत वाढत आहेत हे लक्षात घेऊन या सरकारने विशेषतः ग्राहक सहकारी संस्थांमार्फत पुरवठा करून आवश्यक वस्तूंच्या किमती खाली आणण्याचा निर्धार केला आहे. रास्त किंमतीस उपभोग्य मालाची विक्री करण्यासाठी सरकार राज्यामध्ये सर्वत्र आणखी ग्राहक सहकारी भांडारेही उघडील.

११. या सर्व अडचणींना तोंड द्यावे लागत असूनही, सरकार योजनांतर्गत कामे पार पाडण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. चौथ्या योजनेमधील पाटबंधाऱ्यांचा कार्यक्रम मोठ्या व मध्यम या दोन्ही योजनांसाठी १७८ कोटी रुपयांचा आहे. त्यामुळे अदमासे ११·३३ लक्ष एकर जादा जमीन पाण्याखाली येईल असा अंदाज आहे. प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या दृष्टीने निरनिराळ्या नदीखोऱ्यांच्या पाहणीचे कामही हाती घेण्यात आले आहे.

१२. विद्युतनिर्मितीच्या क्षेत्रात, कोयना जल-विद्युत प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्याच्या कामास सुरुवात झालेलीच आहे. त्यापासून २० टक्के भारक्षमतेवर ३२० मे. वॅ. जादा वीज निर्माण होईल. राज्य वीज मंडळाने एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आखलेला असून त्यामध्ये नाशिक, परळी (बीड जिल्हा) आणि कोराडी (नागपूरजवळ) येथील तीन प्रकल्पांचा प्रामुख्याने समावेश होतो. नाशिक आणि परळी येथील प्रकल्पांचे, तसेच कोराडी येथील प्रत्येकी १४० मे. वॅ. चे दोन संच उभारण्याचे काम चौथ्या योजनेच्या काळात पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

१३. अधिक अन्नोत्पादनाचे महत्त्व लक्षात घेऊन ग्रामीण विभागास वीजपुरवठा करण्याचा वेग आधीच वाढविण्यात आलेला आहे. डिसेंबर १९६६ अखेर, ६,०१२ खेड्यांना वीजपुरवठा करण्यात आला आणि ६०,०५० विजेचे पंप बसविण्यात आले. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात १०,००० खेड्यांना वीजपुरवठा करणे व १,००,००० विजेचे पंप बसविणे हे लक्ष्य ठरविण्यात आले आहे. या वाढत्या गतीने ते लक्ष्य गाठणे फारसे कठीण जाणार नाही.

१४. राज्यामध्ये लोखंड, कोळसा, मँगेनीज, बॉक्साईट व चुनखडी यांची विपुलता आहे. ही खनिजे औद्योगीकरणाच्या दृष्टीने अत्यंत जरुरीची असल्यामुळे त्यांची पाहणी करणे फार महत्त्वाचे आहे. त्याकरिता जादा यंत्रसामग्री व मनुष्यबळ मिळविण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. सिमेंट तयार करण्यासाठी लागणाऱ्या चुनखडीच्या साठ्यांच्या पाहणीचे काम पूर्ण झाले आहे.

१५. चित्रपटगृहातील नोकरवर्गासाठी किमान वेतन पुन्हा निश्चित करण्यात आले आहे. तसेच प्लॅस्टिक उद्योगधंद्याकरिता किमान वेतन निश्चित करण्यासाठी आणि विडी व तंबाखू या उद्योगधंद्यांमधील कामगारांच्या किमान वेतनात सुधारणा करण्यासाठी समित्या प्रस्थापित करण्यात आल्या आहेत.

१६. सहकाराच्या क्षेत्रात, राज्याने, निरनिराळ्या कार्यातील आपली आघाडी कायम ठेवली आहे. उस्मानाबाद व नांदेड जिल्ह्यांत दोन सहकारी साखर कारखाने उभारण्याचे काम चालू असून, पुणे, सांगली, धुळे व अहमदनगर जिल्ह्यांत आणखी चार कारखाने उभारण्यासाठी अनुज्ञप्ती मिळविण्यात आल्या आहेत, याचा मला विशेष उल्लेख करावासा वाटतो. ११ सहकारी साखर कारखान्यांना ऊस गाळण्याच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी परवानही मिळाले आहेत. महाराष्ट्रात साखरेचा उतारा जास्त असलेल्या उसाचे एकरी उत्पादन अधिक होण्याची शक्यता असल्यामुळे येथील साखर उद्योगाला केंद्र शासनाने अधिक महत्त्व दिले पाहिजे, असे या सरकारला वाटते.

१७. दळणवळण सुधारण्यासाठी चौथ्या योजनेत ५५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी १० कोटी रुपये डोंगराळ, दुर्गम व मागास क्षेत्रातील रस्तेबांधणीसाठी व ६ कोटी रुपये विल्बर स्मिथ अहवालाच्या शिफारशींनुसार मुंबई शहरातील दळणवळण सुधारण्यासाठी खर्च करण्याचे योजिले आहे. रत्नागिरी येथील भगवती बंदराच्या बांधकामात चांगलीच प्रगती झालेली आहे. त्याचप्रमाणे, मांडवा, जयगड व दाभोळ येथे धक्के बांधण्याच्या कामातही समाधानकारक प्रगती झालेली आहे.

१८. सरकारने ग्रामीण भागातील पिण्याच्या पाणीपुरवठा योजनांकरिता जिल्हा परिषदांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत उदार धोरण ठेवले आहे. या उदार धोरणाला उत्साहजनक प्रतिसाद मिळाला. त्यामुळे ७,००० खेड्यांमध्ये, १४,४०६ विहिरी, तलाव, विंधण किंवा नलिका विहिरी यांची कामे हाती घेण्यात आली. त्यापैकी, ७,२८७ कामे पूर्ण झाली असून ७,११९ कामे चालू आहेत. याशिवाय, नळाद्वारे पाणीपुरवठ्याच्या १५५ योजना हाती घेण्यात आल्या. या योजनांखाली ४७५ गावे येतात. यापैकी ११६ गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या दोन योजना पूर्ण झाल्या असून २४ गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या दुसऱ्या दोन योजना पूर्ण होत आल्या आहेत व बाकीच्या योजनांचे काम चालू आहे. चालू वर्षी, नळाद्वारे पाणीपुरवठ्याच्या १३ ग्रामीण योजनांना मंजुरी देण्यात आली असून त्या आता लवकरच सुरू होतील. या योजनांखाली ५० गावे येतात.

१९. शासनाने, ३३ नगरपालिका पाणीपुरवठा योजनांना व चार जलनिस्सारण योजनांना मंजुरी दिली आहे. याशिवाय सातारा, अहमदनगर व यवतमाळ पाणीपुरवठा योजनांना सरकारी योजना म्हणून मंजुरी देण्यात आली आहे.

२०. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, आता सबंध राज्यास लागू करण्यात आला आहे. हा अधिनियम होण्यापूर्वी नगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट केलेल्या क्षेत्रापुरतीच विकास योजना आखता येत असे आणि शेजारच्या क्षेत्राच्या विकासाशी तिचा समन्वय करणे शक्य होत नसे. या अधिनियमामुळे शासनाने स्थापन करावयाच्या प्रादेशिक मंडळांना नगरपालिका क्षेत्र, तसेच त्याच्या आजूबाजूचे क्षेत्र या दोहोंचाही समावेश होईल अशा प्रादेशिक विकास योजना आखणे शक्य होते, हे त्याचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य आहे. या अधिनियमाचे दुसरे वैशिष्ट्य असे की, त्यामध्ये नवीन नगरवसाहतींसाठी तरतूद केली आहे. या तरतुदीमुळे, नगरक्षेत्राच्या योजनारहित वाढीवर परिणामकारक नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.

२१. बृहन्मुंबई व पुणे या शहरांच्या विकास योजनांची छाननी करण्यात आली असून त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. मुंबई व पुणे ह्या नगरक्षेत्रांच्या प्रादेशिक योजनांचे काम प्रगति-पथावर आहे.

२२. गलिच्छ वस्त्यांचे उच्चाटन करण्याच्या हेतूने देशातील एक महत्त्वाचे शहर म्हणून विशेष लक्ष पुरविण्यासाठी मुंबई शहराची निवड करण्यात आली आहे.

२३. कुटुंब नियोजन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने जोमदार उपाययोजना केली आहे. या क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल या राज्याला तीन वेळा राष्ट्रीय पारितोषिक मिळाले आहे यावरून ही गोष्ट स्पष्ट होते.

२४. शिक्षणाच्या क्षेत्रात प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या विस्ताराचा वेग कायम ठेवण्यात आला असून शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी यापूर्वीच सुरू केलेल्या उपाययोजनांचा जोरदार पाठपुरावा करण्यात आला आहे. ग्रामीण क्षेत्रातील होतकरू विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे माध्यमिक शिक्षण मिळावे म्हणून कोयनानगर व औरंगाबाद येथे वसतिगृहाची सोय असलेली दोन विद्यानिकेतने स्थापन करण्यात आली. नाशिक व चिखलदरा येथे अशी आणखी दोन विद्या-निकेतने स्थापन करण्याचे योजिले आहे. चांगल्या दर्जाची पाठ्यपुस्तके रास्त किंमतीस उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आणि अभ्यासक्रमाचे संशोधन व विकास याकरिता कायमची यंत्रणा असावी म्हणून शासनाने राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन केंद्र स्थापन केले आहे. १९६२ मध्ये स्थापन झालेली राज्य शिक्षण संस्था पूर्णतया विकसित झाली असून आता तिला पदव्युत्तर संशोधन संस्था म्हणून मान्यता मिळाली आहे. शिक्षकांना पद्धतशीर प्रशिक्षण देण्याच्या कार्यक्रमांना चालना देणे हा या संस्थेच्या कामाचा एक भाग आहे. त्या दृष्टीने अलीकडेच एक राज्य अध्यापक शिक्षण मंडळही स्थापन करण्यात आले आहे. राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची दुसरी शैक्षणिक पाहणी करण्याचे काम या संस्थेच्या देखरेखीखाली व मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले आहे. ग्रामशिक्षण मोहीम ही या राज्याची एक अनन्यसाधारण कामगिरी असून तिला जळगाव, पुणे, कोल्हापूर व नागपूर या जिल्ह्यांत खूपच चालना मिळाली आहे.

२५. जादा साधनसामग्री, शिक्षक व इतर भौतिक सोयी पुरवून तंत्रशिक्षण संस्था भक्कम व बळकट करण्यासाठी उपाययोजना करण्यात आली आहे. नागपूर येथील प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालयाची मुख्य इमारत पूर्ण झाली असून महाविद्यालयाने या नवीन जागेत आपल्या कामाला सुरुवातही केली आहे.

२६. अल्पबचतीची चळवळ समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत पोहोचविण्यासाठी शासनाने जोराचे प्रयत्न चालू ठेवले आहेत. या प्रयत्नांच्या परिणामी मागील वर्षाचे लक्ष्य ओलांडण्यात आले असून शासनाला सबंध देशात पहिला क्रमांक मिळालेला आहे.

२७. वनविकासाच्या क्षेत्रात वननिर्मिती व झाडांची लागवड करण्याच्या कार्यक्रमास ह्या वर्षी आणखी चालना देण्यात आली आहे. वनसामग्रीचा पुरेपूर फायदा करून घेण्याच्या दृष्टीने वापरल्या

जाणाऱ्या साधनांचे आधुनिकीकरण करण्यासाठी उपाययोजना करण्यात आली आहे. वनक्षेत्रातील दुर्गम प्रदेश लोकांना खुले करण्यासाठी रस्ते बांधण्याच्या कार्यक्रमावर चालू वर्षी सुमारे ३८ लाख रुपये खर्च करण्यात येतील.

वनग्रामात वस्ती करणाऱ्या लोकांना, ते ज्या जमिनीची लागवड करीत असत त्या जमिनीच्या भोगवटयाचे संपूर्ण हक्क मिळालेले नव्हते. त्यांना आपल्या जमिनीच्या विकासाकरिता असलेल्या सवलतींचा लाभ मिळावा म्हणून या शासनाने, नवीन धारणा पद्धतीच्या तत्त्वावर त्यांना भोगवटयाचे हक्क देण्याचे ठरवले आहे.

२८. पाटबंधारे, वीज व इतर प्रकल्प यांमुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाचे काम सुलभ व्हावे म्हणून जिल्हा पुनर्वसन सल्लागार समित्या स्थापन केल्या असून त्यांचे काम समाधानकारकपणे चालू आहे. तसेच, या शासनाने अशा विस्थापित व्यक्तींना त्यांच्या जमिनीबद्दल जमीन द्यावयाचे ठरवले आहे.

२९. आपले राज्य व म्हैसूर राज्य यांमधील सीमावादाबाबत अहवाल सादर करण्याकरिता केंद्र सरकारने आता महाजन आयोगाची नियुक्ती केली आहे. याबद्दल शासनाला समाधान वाटत आहे. आयोगाची नियुक्ती गेल्या ऑक्टोबरमध्येच झाली असून त्याच्या कामाला सुरुवातही झाली आहे. येत्या काही महिन्यांत त्याचे काम पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. आयोग या वादाच्या गुणावगुणांचा योग्य विचार तर करीलच, शिवाय नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत या वादाशी संबंधित असलेल्या लोकांनी व्यक्त केलेल्या इच्छाही विचारात घेईल अशी या शासनाला दृढ आशा वाटते.

३०. प्रस्तुत अधिवेशन हे मुख्यतः शासनास पुढील चार महिन्यांचा खर्च करण्याचा प्राधिकार मिळावा म्हणून लेखानुदान मंजूर करून घेण्याकरिताच बोलावण्यात आले आहे. हे अधिवेशन त्यामुळे अल्प मुदतीचे राहील व त्यात विशेष महत्त्वाचा कोणताही वैधानिक कार्यक्रम असणार नाही. तथापि, ह्या अल्प मुदतीच्या अधिवेशनातसुद्धा शासनाला आपण आपल्या सल्ल्याचा व मार्गदर्शनाचा लाभ द्याल याबद्दल मला मुळीच शंका वाटत नाही.